# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४(१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

## ( परीक्षा विभाग )

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली–४४२६०५

फोन नंबर ०७१३२–२२३३२० website : gondwanadigitaluniversity.ac.in

जा.क्र.गों.वि./परीक्षा विभाग/ (८५/२०१६ दि. १३/०५/२०१६

## परीपत्रक

सर्व संबधित महाविद्यालयातील प्राचार्यांना व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, उन्हाळी २०१६ मध्ये परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकेची Photocopy/Xerox copy, Challenge To Valuation तसेच Retotalling Of Paper यासाठी खालील पध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

### १) Procedure Of Photocopy/Xeroxcopy

विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकेची Photocopy/Xerox copy पाहिजे असल्यास सदर विद्यार्थ्यांना त्यांच्या महाविद्यालयामध्ये जावून Appendix-A हा Online Form भरावा तसेच त्यासोबत महाविद्यालयामध्ये प्रतिपेपर ३००/– रूपये शुल्क भरावे आणि महाविद्यालयांनी सदर फार्म विद्यापीठामध्ये जमा करावा. या सदराखाली विद्यार्थ्यांना Photocopy/Xerox copy देण्यात येईल. **(फक्त दोन विषयाकरीता)**

### २) Procedure Of Challengee To Valuation/Revaluation

विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकेचे Challenge To Valuation/Revaluation करावयाचे असल्यास सदर विद्यार्थ्याने त्यांच्या महाविद्यालयामध्ये जावून Appendix-B हा Online Form भरावा तसेच त्यासोबत महाविद्यालयामध्सये पुनर्मुल्यांकनासाठी प्रतिपेपर ५००/– रूपये शुल्क भरावे आणि महाविद्यालयांनी सदर फार्म विद्यापीठामध्ये जमा करावा. **(फक्त दोन विषयाकरीता)** या पध्दतीमध्ये विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांचे फक्त Revalution करण्यात येईल याची नोंद घ्यावी. Xerox प्रत पाहिजे असल्यास प्रति ३००/– रूपये शुल्क सोबतच वेगळे भरावे लागेल.

### ३) Procedure Of Retotalling Of Papers

विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकेचे Retotalling करावयाचे असल्यास सदर विद्यार्थ्यांना त्यांच्या महाविद्यालयामध्ये जावुन Appendix-C हा Online Form भरावा तसेच त्यासोबत महाविद्यालयामध्ये प्रतिपेपर १००/– रूपये शुल्क भरावे त्यानंतर महाविद्यालयांनी सदर फार्म विद्यापीठामध्ये जमा करावा. **(विद्यार्थ्यांना Retotalling सर्व विषयाचे सुध्दा करता येईल)**

महाविद्यालयाने धनाकर्ष हा कोणत्याही राष्ट्रीय कृत बॅकेचा व तो **"वित्त व लेखा अधिकारी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली"** यांचे नावे काढावा किंवा विद्यापीठामध्ये रोखीने सुध्दा पैसा भरता येईल.

ज्या अभ्यासक्रमाचे निकाल घोषीत होतील त्या तारखेपासून वरील प्रक्रियेकरीता दहा दिवसाची वेळ राहील. तसेच असे सर्व आवेदन पत्र महाविद्यालयाने त्यांनतर तीन दिवसाच्या आत विद्यापीठात जमा करावे. याची कृपया नोंद घ्यावी.

परीक्षा नियंत्रक
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४(१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

**( परीक्षा विभाग )**

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली–४४२६०५

फोन नंबर ०७१३२–२२३३२० website : gondwanadigitaluniversity.ac.in


जा.क्र.गों.वि./परीक्षा विभाग/८४९/२०१६ दि. १३/०५/२०१६

परीपत्रक

**(For On Screen Revaluation)**

सर्व संबधित महाविद्यालयातील प्राचार्याना व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, उन्हाळी २०१६ मध्ये परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकेचे मुल्यांकन (अभियांत्रिकी,विधी,औषधीशास्त्र विद्याशाखा आणि एम.एससी, एम.कॉम, एम.बी.ए. अभ्यासक्रम) On Screen पध्दतीने झालेले आहे, त्या विद्यार्थ्यांनी Hardcopy (Photocopy), आणि Challenge To Valuation (Revaluation) यासाठी गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोलीचे निर्देश क्रमांक १७८/२०१५ नूसार खालील पध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

## १) Procedure For Hardcopy (Photocopy) application

विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकेच्या पुनर्मुल्यांकनाकरीता Hardcopy साठी अर्ज करावा लागेल. सदर विद्यार्थ्यांनी त्यांच्या महाविद्यालयामध्ये जावुन निकाल घोषीत झाल्याच्या ५ दिवसाच्या आत Online पध्दतीने अर्ज करावा. त्याकरीता प्रतिपेपर ३००/– रूपये शुल्क आकारण्यात येईल. संबधित महाविद्यालयांनी त्यांच्या महाविद्यालयामध्ये भरलेले अर्ज विद्यापीठामध्ये २ दिवसाच्या आत जमा करावे, या सदराखाली त्याच्या उत्तरपत्रिकेची Hardcopy (Photocopy) देण्याची कार्यवाही घेण्यात येईल. **(फक्त दोन विषयाकरीता)** या करीता संबधित महाविद्यालयाच्या Log In वर Hardcopy (Photocopy) देण्यात येईल व महाविद्यालयांनी संबधित विद्यार्थ्याला ३ दिवसात Hardcopy (Photocopy) उपलब्ध करून दयावी. ही जबाबदारी सर्वस्वी महाविद्यालयाची राहील.

## २) Precedure For Challengee To Valuation (Revaluation)

विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकेची Hardcopy (Photocopy) प्राप्त झाल्यानंतर Challengee To Valuation (Revaluation) करावयाचे असल्यास ताबोडतोब २ दिवसाच्या आत संबधित महाविद्यालयामध्ये जावुन Online पध्दतीने अर्ज करावा. पुनर्मुल्यांकनासाठी प्रतिपेपर १५०/– शुल्क आकारण्यात येईल. विद्यार्थ्याने संबधित महाविद्यलयामध्ये Online अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयाने त्यांना प्राप्त अर्ज २ दिवसाच्या आत विद्यापीठामध्ये जमा करणे आवश्यक राहील. **(फक्त दोन विषयाकरीता)** ज्या विद्यार्थ्याने Hardcopy साठी अर्ज केला असेल अशाच विद्यार्थ्यांना Challenge To Valuation (Revaluation) करीता अर्ज करता येईल

महाविद्यालयाने धनाकर्ष हा कोणत्याही राष्ट्रीय कृत बॅकेचा व तो "वित्त व लेखा अधिकारी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली" यांचे नावे काढावा किंवा विद्यापीठामध्ये रोखीने सुध्दा पैसा भरता येईल.

नोट :– अभियांत्रिकी,विधी,औषधीशास्त्र विद्याशाखा आणि एम.एससी, एम.कॉम, एम.बी.ए. अभ्यासक्रम या पैकी ज्या विषयाचे निकाल घोषीत होतील त्या दिनांकापासुन ग्राहय धरण्यात येईल, याची सर्व महाविद्यालय व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. Hardcopy (Photocopy) आणि Challenge To Valuation (Revaluation) ची प्रक्रियाा www.gondwanaexam.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

परीक्षा नियंत्रक
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली